# सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati.dte@gmail.com Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (0721) 257 7913


**महत्वाचे** क्रमांक :-विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/3736

**कालमर्यादीत दि. १६/१२/२०१६ पर्यंत.** दिनांक 1 4 DEC 2016

**प्रति,**

**प्राचार्य,**
सर्व विना-अनुदानित अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र पदविका व पदवी संस्था
एम.बी.ए. / एम.सी.ए. पदव्युत्तर पदवी संस्था.
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :-शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास वर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती योजनेबाबत संबंधीत संस्थेनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक माहिती (Qualification Details) अद्यावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** १) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शा.नि.क्र. टीईएम-२०१५/प्र.क्र.२१९ /ताशि-४ दि ३१/३/२०१६.
२) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/२९८२ दि.८/९/२०१६.
३) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/३३७८ दि.२६/१०/२०१६.
४) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/३४६३ दि.९/११/२०१६.
५) या कार्यालयाचे पत्र क्रमांक विकाअ/शिक्षण/ईबीसी/२०१६/३६१० दि.१/१२/२०१६.

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, आपण शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागास वर्गीय विद्यार्थ्याचे शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती मिळण्याकरीता ईबीसी अर्ज या कार्यालयास सादर केले आहे. तसेच शै. व. २०१५-१६ मधील ईबीसी पात्र धारक विद्यार्थ्यांना संबंधीत योजनेचा लाभ मिळण्याचे दृष्टीने आपल्यास्तरावर ईबीसी पात्र विद्यार्थ्यांचे निकाल तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे संकेतस्थळावर अद्यावत करुन व त्याची या कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून निकालाची तपासणी करुन ऑनलाईन अप्रुव्हल देणे बंधनकारक असल्याबाबत संदर्भीय पत्र क्रमांक ३, ४ व ५ अन्वये कळविलेले होते. परंतू अजूनपर्यंत सदर माहिती अद्यावत केलेली नसल्याचे दिसून येते.

तेव्हा आपणास पुनश्च कळविण्यात येते की, शेवटची संधी म्हणून आपण **दिनांक १६/१२/२०१६** पर्यंत सदर ईबीसी लॉगीनमध्ये संपुर्ण निकालाची (दोन्ही सत्राची) माहिती भरावी व माहिती भरुन झाल्यानंतर आपल्या संस्थेमध्ये संबंधीत काम हाताळणारे व्यक्तीस या कार्यालयामध्ये सर्व निकालाचे दस्तऐवज घेवून प्रत्यक्ष हजर राहून या कार्यालयाचे लॉगीनमधून अप्रव्हल घेण्यास वरील दिनांकाच्या आत करुन घेण्यास कळवावे.

तसेच याबाबत आपणास कळविण्यात येते की, दिलेल्या दिनांकापर्यंत निकालाबाबतची माहिती ईबीसी लॉगीनमध्ये न भरल्यास अथवा या कार्यालयास उपस्थित न राहल्यास शुल्क प्रतीपुर्ती करीता प्राप्त झालेला निधी परत गेल्यास व त्यामुळे विद्यार्थ्याचे आर्थिक नुकसान झाल्यास या योजनेपासून विद्यार्थी वंचित राहिल्यास याची संपुर्ण जबाबदारी संस्था प्रमुखाची राहिल, याची कटाक्षाने नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीकरीता सादर.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.